सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/बारावी नंतरचे पदविका/औषधनिर्माणशास्त्र/कॅप फेरी/५३० दिनांक : ०६/११/२०२४

**प्रवेशासाठीची सुचना**

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम**

संदर्भ : १. संचालनालयाचे प्रवेशासाठीचे वेळापत्रक क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/बारावी नंतरचे पदविका/औषधनिर्माणशास्त्र/कॅप फेरी/४८८, दिनांक : ०७/१०/२०२४

२. शासनपत्र क्रमांक : मान्यता- २०२४ / प्र.क्र. ४२१ / तांशि-४, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४

संचालनालयाच्या संदर्भीय १ च्या वेळापत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता पुर्णवेळ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक घोषित करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या दुस-या फेरीचे जागावाटप घोषित करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे या प्रकियेसाठी दि. २६/१०/२०२४ ते दि. ३०/१०/२०२४ हा कालावधी घोषित करण्यात आलेला आहे.

काही औषधनिर्माणशास्त्र संस्थांनी फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाने त्यांना दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती केली आहे. या प्रकरणी घ्यावयाच्या निर्णयाबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. या पार्श्वभूमीवर, औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या सद्यस्थितीत सुरु असलेल्या प्रवेश प्रक्रियेस, आहे त्या स्थितीत पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत असल्याचे शासनाने संदर्भाधीन २ च्या पत्रान्वये या संचालनालयास कळविले आहे.

शासन निर्देशास अनुसरुन, प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीसाठी (कॅप-३) रिक्त जागा प्रदर्शित करणे, विकल्प अर्ज भरणे, जागावाटप घोषित करणे, जागा स्वीकृत करणे, संस्थेमध्ये उपस्थित राहणे इ. बाबतच्या पुढील वेळापत्रकाबाबतची माहिती प्रवेशप्रर्कियेच्या **https://phd24.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्याअनुषंगाने उमेदवार व संस्थांनी नियमीतपणे या संकेतस्थळाला भेट द्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई